८. दोन्ही शाळांच्या फीचे दर शासनाने विहित केल्यानुसार असले पाहिजेत. त्यापेक्षा जादा फी घेता कामा नये.

९. मुंबई प्राथमिक शिक्षण नियमावली १९४९ मधील विहित अटींची पूर्तता करणे आवश्यक आहे.

१०. नियमानुसार अनुसूचित जाती/जमातीच्या शिक्षकांचे प्रमाण भरलेच पाहिजे.

२. आपणांस विनंती आहे की, वरील अटींची पूर्तता झाल्यानंतरच या प्रकरणी नियमानुसार आवश्यक ती कार्यवाही करावी व आपल्या कार्यपूर्तिचा अहवाल शासनात यथावकाश पाठवावा.

[ बं० कों० व्यवहारे ]
सहाय्यक सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे.
शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, पुणे.
प्रशासनाधिकारी, महानगरपालिका शिक्षण मंडळ, पुणे.
अध्यक्ष, भारती विद्यापीठ, एरंडवणे, पुणे

यांचेकडे माहितीसाठी आणि नियमानुसार आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

कोरगांवकर. ३. ४

(५६) (१) पुणे

महाराष्ट्र शासन

क्रमांक: व्हिएलएस-१०८२/५०६०५[सीआरर-९]प्राशि-३.
शिक्षण व सेवायोजन विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ३ एप्रिल, १९८४.

प्रति,

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग,
पुणे.

विषय :- भारती विद्यापीठ, एरंडवणे, पुणे.
मराठी व इंग्रजी माध्यमाच्या
प्राथमिक शाळांस परवानगी...

भारती विद्यापीठ या संस्थेने एरंडवणे, पुणे येथे सुरू केलेल्या मराठी व इंग्रजी माध्यमाच्या प्राथमिक शाळांस शासनाने घातलेली सर्वसाधारण बंदीची अट अंशत: शिथिल करून अपवादात्मक परिस्थितीत "खास बाब" म्हणून कायम विना अनुदान तत्वावर खालील अटींच्या आधीन राहून शासन मंजूरी देत आहे.

१. नियमानुसार संस्था रजिस्टर्ड असली पाहिजे.

२. संस्थेने ह्या प्राथमिक शाळा कायम विना अनुदान तत्वावर चालविण्याची व भविष्यकाळात कधीही शासनाकडे अनुदानाची मागणी करणार नाही अशी लेखी संमती दिली पाहिजे.

३. संस्थेने दोन्ही शाळांचा एकूण शिक्षक वर्ग विहित वयोमर्यादित व प्रशिक्षित [एस.एस.सी.डी.एड.] नेमलाच पाहिजे व त्यांना शासनाने ठरवून दिलेले वेतन व भत्ते दिले पाहिजेत.

४. संस्थेने शाळांसाठी स्वतंत्र व आधुनिक शैक्षणिक साहित्याने परिपूर्ण अशी स्वत:ची इमारत उपलब्ध केली पाहिजे.

५. शाळेतील प्रत्येक वर्गामध्ये शासनाने ठरवून दिलेली विद्यार्थी पटसंख्या व हजर संख्या असली पाहिजे.

६. संस्थेने जवळपासच्या शाळेवर आपल्या शाळांमुळे कोणताही दुष्परिणाम होणार नाही याची दक्षता घेतली पाहिजे.

७. शासनाने वेळोवेळ दिलेल्या आदेशाचे संस्थेने पालन केलेच पाहिजे.

BHARATI VIDYAPEETH
Inward No. 1/814
7-4-84

२...